**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठात वित्त व लेखा अधिकारी पदावर डॉ.बी.डी. कऱ्हाड रुजू

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी पदावर डॉ.बी.डी. कऱ्हाड आज रुजू झालेत. प्रभारी वित्त व लेखा अधिकारी श्री मंगेश वरखेडे यांचेकडून त्यांनी आपल्या पदाची सूत्रे स्वीकारलीत, कुलगुरू दालनात त्यांचे पुस्तक देवून कुलगुरू डॉ. मुरलीदर चांदेकर यांनी स्वागत केले. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी श्री मंगेश वरखेडे, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुकर उपस्थित होते.

डॉ.बी.डी. कऱ्हाड यापूर्वी जळगांव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात वित्त व लेखा अधिकारी पदावर कार्यरत होते. एम.कॉम, एम.बी.ए. (वित्त) सी.ए. असलेल्या डॉ. कऱ्हाड यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथून 'खरेदी व्यवस्थापन' या विषयात आचार्य पदवी प्राप्त केली आहे. ते यापूर्वी पुणे येथील व्यवस्थापन, संशोधन आणि विकास केंद्र येथे व्यवस्थापनाचे प्राध्यापक, बी.एम. वाणिज्य महाविद्यालय, पुणे येथे सहयोगी प्राध्यापक, चिंतामणराव वाणिज्य महाविद्यालय, सांगली येथे उपप्राचार्य म्हणून त्यांनी उत्कृष्ट रितीने कार्य केले आहे. त्यांना पुणे विद्यापीठाच्या उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

परीक्षा व संशोधन कार्याचा त्यांना अनुभव असून त्यांनी पेपर सेटर, मॉडरेटर आणि विद्यापीठ परीक्षक म्हणून कार्य केले आहे. ते वाणिज्य, व्यवस्थापन आणि व्यवसाय प्रशासन या विषयाचे संशोधक मार्गदर्शक असून त्यांचे आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये बारा शोधनिबंध, राष्ट्रीय जर्नल्समध्ये सहा आदी प्रकाशित झाले आहेत. त्यांनी दोन आंतरराष्ट्रीय, पाच राष्ट्रीय, तीन राज्यस्तरीय आणि दोन विद्यापीठस्तरीय सेमिनार व परिषदांमध्ये सहभाग घेतला आहे. याशिवाय आय.सी.ए.आय. द्वारा आयोजित अठ्ठावीर सेमिनारमध्ये त्यांनी उपस्थिती दर्शविली आहे. नवी दिल्ली येथील दी इंस्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाऊंट्स ऑफ इंडिया व पुणे येथील वेस्टर्न महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टीशनर्स असोशिएशनचे ते सदस्य आहेत.

डॉ.बी.डी. कऱ्हाड हे विद्यापीठात वित्त व लेखा अधिकारी पदावर रुजू झाल्यामुळे वाणिज्य क्षेत्रातील त्यांना असलेल्या प्रचंड ज्ञानाचा फायदा विद्यापीठाला होणार आहे, त्यांचे सार्वत्रिक अभिनंदन.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २७/११/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी